# पुणे मेट्रोच्या भुयारी कामात टनेल ब्रेक थ्रू टप्पा पार





**पुणे , २८.०९.२०२० :** पुणे मेट्रोच्या पीसीएमसी ते स्वारगेट या मार्गिकेत ५ किमीचा भुयारी मार्ग आहे. हा भुयारी मार्ग कृषी महाविद्यालय येथील सुरवात होत असून स्वारगेट पर्यंत जाणार आहे. या मार्गामध्ये शिवाजीनगर बस स्थानक , सिविल कोर्ट , फडके हौद, मंडई व स्वारगेट ही पाच स्थानके असणार आहेत. भुयारी मार्गाचे काम लवकर होण्यासाठी स्थानकांच्या ठिकाणी मोठा खड्डा करून खालुन बांधकाम करण्यात येते व भुयारी मार्गाचे काम टनेल बोरिंग मशीनच्या साहाय्याने करण्यात येते. जेव्हा टनेल बोरींग मशीन भुयारी स्थानकासाठी खोदलेल्या खड्ड्यात दाखल होते. या घटनेला टनेल ब्रेक थ्रू म्हटले जाते. आज दि. २८.०९.२०२० रोजी अशीच एक ऐतिहासिक घटना व पुणे मेट्रोच्या भुयारी कामातला महत्वाचा मैलाचा दगड पार पाडला आहे. कृषी महाविद्यालयातून निघालेले टनेल बोरींग मशीन हे सिव्हिल कोर्ट येथील स्थानकासाठी खोदलेल्या खड्ड्यात दाखल झाले आहे. आज दुपारी ३ वाजता हा ब्रेक थ्रू टप्पा पार पडला . कृषी महाविध्यलय येथून ३०.१०.२०१९ रोजी निघालेले टनेल बोरींग मशीन बरोबर १० महिन्यांनी १६०० मीटरचे टनेलचे काम पुर्ण करून आज सिव्हिल कोर्ट येथे दाखल झाले. मशीन १० मिलिमीटर अचूकतेने सिव्हिल कोर्ट येथे दाखल झाले. सिव्हिल कोर्ट मध्ये १६० मी एन.ए.टी.एम पध्दतीद्वारा एक बोगदा करण्याचे काम चालू आहे. या बोगद्याच्या उत्तरेकडील भागामध्ये टनेल बोरिंग मशीनच्या कटरने प्रवेश करून हा ब्रेक थ्रू साधला आहे. अशाप्रकारे एन.ए.टी.एम बोगद्यात टनेल ब्रेक थ्रू ही भारतातील निवडक घटनांपैकी एक आहे. टनेल बोरींग मशीनचा ६.४ मीटरच्या अजस्त्र कटर हेडने जेव्हा दगड फोडून एन. ए. टी. एम. बोगद्या मध्ये प्रवेश केला तेंव्हा महामेट्रोच्या उपस्थित इंजिनियर आणि अधिकारी वर्गाने त्याचे जल्लोषात स्वागत केले. आज झालेल्या टनेल ब्रेक थ्रू मशीनचे नाव मुठा असून त्याच्या सोबतीने मुठा टीबीएम मशीन लवकरच सिव्हिल कोर्ट मध्ये लवकरच ब्रेक थ्रू साधणार आहे. या प्रसंगी महामेट्रोच्या श्री. अतुल गाडगीळ ,संचालक (प्रकल्प ), श्री . हेमंत सोनावणे , महाव्यवस्थापक (जनसंपर्क ) , श्री . राजेश जैन व बेनी जोसेफ (टाटा प्रोजेक्ट ), श्री. अल्पर (गुलेरमार्क टाटा प्रोजेक्ट ) इत्यादी अधिकारी उपस्थित होते.

यावेळी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ.ब्रिजेश दीक्षित यांनी आनंद व्यक्त केला आहे. आणि म्हटले आहे की आजचा ब्रेक थ्रू पुणे मेट्रोच्या भुयारी मार्गाचा महत्वाचा टप्पा आहे. महामेट्रोने पुणेकरांचे मेट्रोत प्रवास करण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्नशील आहे. प्रकल्प लवकरात लवकर पुर्ण करण्यासाठी महामेट्रो प्रयन्तशील आहे. महामेट्रो अत्यंत गुणवत्तापुर्वक व सर्व सुरक्षा नियमांना अधीन राहुन मेट्रोचे काम वेगाने पुर्ण करत आहे.